**SANSKRUTI INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL**

***Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj***

***IFSIJ Impact Factor : 6.225***

# स्थानिक इतिहास : पेठ वडगाव नगरपरिषद

**प्रमोद सुकुमार कराडे**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड. जि. सातारा

ईमेल- karadepramod04@gmail.com

**प्रास्ताविक :**

सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार नागरी सुविधा पुरविणाऱ्या स्थानिक पातळीवरील लोकनियुक्त संस्था, ग्रामीण व शहरी स्तरांवरील स्वशासनाचा कारभार करणाऱ्या व्यवस्थेला स्थानिक स्वराज्य संस्था असे म्हणतात. स्थानिक स्वराज्य संस्था हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे येथे अनेक राजकीय स्थित्यंतरे होऊनही त्यांचे अस्तित्व हजार वर्षे टिकून आहे. या संस्थांनी राजकीय शिक्षणाद्वारे लोकांच्या राजकीय जाणिवा, जागृती व सहभाग यातून नव नेतृत्व निर्मितीची प्रक्रिया गतिमान केले आहे. प्रमुख्याने ऐतिहासिक दृष्ट्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्थूलमानाने तीन कालखंड पडतात एक ब्रिटिश अंमल पूर्वकाळ, दोन ब्रिटिश अंमल काळ तिन स्वातंत्र्योत्तर काळ भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील लोक एकत्रित येऊन गावातील समस्यांवर विचारविनिमय करीत त्यासाठी गावातील सोड नागरिकांची सभा बोलवली जात असे आणि त्या माध्यमातून त्यांचा कारभार पहिला जात होता. ही व्यवस्था पेशवाईच्या अस्तापर्यंत(1818) अस्तित्वात होती.

दुसरा कालखंड म्हणजे ब्रिटिश अंमलाचा कालखंड या काळात स्थानिक संस्थेत अमुलाग्र बदल झाले आणि इंग्रजी काळात विद्यमान लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा उगम झाला. त्यामुळे ग्रामीण व शहरी जीवनात खूप बदल झाले. तत्कालीन ब्रिटिश शासनाने प्रथम 1850च्या कायद्याने ग्रामपंचायतीपेक्षा मोठ्या शहरातून नगरपालिका स्थापन करण्याचा हक्क त्या त्या नगरातील लोकांना दिला. या कायद्यानुसार महाराष्ट्रातील अनेक शहरांमधून नगरपालिका स्थापन झाल्या. त्यामुळे शासन व नागरी जनता यात प्रत्यक्ष संपर्क सुरू झाला.

तिसरा कालखंड म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळ त्या काळामध्ये भारतातील लोकशाही प्रणाली सुदृढ, सक्षम व विकसित करण्याच्या उद्देशाने सरकारने कल्याणकारी शासनव्यवस्थेचा स्वीकार केला. त्या दृष्टिकोनातून तळागळातील स्थानिक संस्थांना स्वायत्तता स्वातंत्र्य देण्यात आले. त्यानुसार लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार पंचायत राज संस्थांची स्थापना झाली.

स्थानिक संस्थांचा इतिहास पाहत असताना पेठवडगाव नगरपरिषदेच्या प्रशासनाचा इतिहास, राजकीय जडणघडणीचा इतिहास, नेतृत्व विकासाचा इतिहास पाहणे गरजेचे आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंध हा स्थानिक इतिहासाचा अविभाज्य घटक असल्यामुळे त्यावर प्रकाश टाकण्याचे गरजेचे असल्याने हा शोधनिबंध सादर करत आहे.

**नगरपरिषदांचे वर्गीकरण-**

पेठवडगाव नगरपरिषदेचा राजकीय अभ्यास करण्यापूर्वी महाराष्ट्रातील नगरपरिषदांचे वर्गीकरण पाहणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात नगरपरिषदांच्या वर्गीकरण लोकसंख्येच्या आधारावर केलेले आहे.

| वर्ग | लोकसंख्या | सदस्यसंख्या |
|---|---|---|
| अ वर्ग नगरपरिषद | एक लाखापेक्षा जास्त | 40 ते 60 |
| ब वर्ग नगरपरिषद | 40000 ते 100000 | 30 ते 40 |
| क वर्ग नगरपरिषद | 25000 ते 40000 | 20 ते 30 |

**पेठ वडगाव नगरपरिषदेचा अभ्यास** –

कसबा वडगाव हा गाव कोल्हापूर जिल्ह्यातील असणाऱ्या मोठ्या गावांपैकी एक गाव असल्याने यास कसब्या चा गाव म्हणून, तसेच पूर्वीपासून येथे धान्याचे व कापडाची बाजारपेठ असून जनावरांचा बाजार ही मोठ्या प्रमाणात भरत असल्याने या गावास बाजार वडगाव किंवा पेठवडगाव असे, आणि हा गाव राजे लोकांचे राहण्याचे प्रिय ठिकाण असून येथे काही काळ राजे लोकांचे वास्तव्य होते. या म्हणून गावास राजाचे वडगाव अशा नावाने ही ओळखला जातो. पेट वडगाव ऐतिहासिक प्रसिद्धीचा गाव असून कोल्हापूर छत्रपती सातारकर यांच्या संघर्षांमध्ये या गावाला एक लष्करी महत्त्व प्राप्त झाले होते. म्हणूनच याठिकाणी भुईकोट किल्ला बांधला होता. छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूरकरांचे राजघराण्यातील पुरुषांची राहण्याचीही आवडती जागा होती.

ब्रिटिश काळामध्ये सुद्धा एक व्यापारपेठ पेठवडगाव म्हणून ओळखत होता. या काळात विद्यमान लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा उगम झाला ब्रिटिश शासनाने प्रथम 1850 च कायद्याने ग्रामपंचायती पेक्षा मोठ्या शहरातून नगरपालिका स्थापन करण्याचा अधिकार त्या नगरातील लोकांना दिला. या कायद्यानुसार महाराष्ट्रातील अनेक शहरांमधून नगरपालिका स्थापन झाल्या. कोल्हापूर जिल्ह्यात प्रथम म्हणजे1883- 1884 साली चार नगरपालिका होत्या. 1) कोल्हापूर 2) नरसोबाची वाडी 3) इचलकरंजी 4) कागल ह्या ठिकाणी होत्या. पण जिल्ह्यातील इतर गावांमध्ये ही नगरपालिका स्थापन व्हाव्यात अशी आज्ञा झाल्यानंतर पेठवडगाव संबंधी माहिती मागवून त्यासंबंधाने काम चालून अखेर मे. कौन्सिल ऑफ एडमिनिस्ट्रेशन चा ठराव नं.538 तारीख 13 जुलै 1887 साली झाला. त्यानुसार 1 ऑगस्ट 1887 सालापासून नगरपालिका स्थापन करण्यात आली. गावची लोकसंख्या 5294 इतकी होती. सध्या वडगाव नगर परिषद क वर्ग नगरपालिका म्हणून गणली जाते.

**नगरपरिषदेची राजकीय जडणघडण-**

महानगरपालिका स्थापन झाली त्यावेळी तिचा कारभार संपूर्ण सरकारी यंत्रणेने चालू झाला. स्थापनेच्या वेळी प्रेसिडेंट,व्हा. प्रेसिडेंट आणि मेंबर कौन्सिलचे हुकुमाने नेमण्यात आलेल्या सोळा सदस्यांमार्फत कारभार चालला होता. पुढे 1927 सालापासून लोकनियुक्त प्रतिनिधीच्याकडे बरेच अधिकार आले. त्यातून बराचसा नगरपालिकेचा कारभार गावच्या लोकप्रतिनिधींच्या हाती आला.

01 मार्च 1949 रोजी कोल्हापूर संस्थान मुंबई राज्यात विलीन झाले. या विलीनीकरणामुळे पूर्वीचा कोल्हापूर डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ऍक्ट-1925 चा कायदा रद्द होऊन त्याऐवजी दि बॉम्बे डिस्ट्रिक्ट मुनिसिपल अ‍ॅक्ट 1901 हा कायदा लागू झाला. या नवीन कायद्यान्वये नगरपालिकेच्या हद्दीतील वेगळ्या पाच वार्डमधून 16 सदस्य निवडून येण्याचे ठरले. ही निवडणूक 8 मे 1952 रोजी झाली या लोकप्रतिनिधींच्या बॉडीकडून निवडण्यात आलेले स्वतंत्र भारतातील पहिल्या नगरपालिका समितीतीचे नगराध्यक्ष श्री. दत्ताजीराव खंडागळे हे नगरपालिका प्रशासनाचे राजकीय प्रमुख होते. सध्या नगरपालिका सदस्य संख्या 17 इतकी आहे.

त्यानंतरच्या निवडणुकीमध्ये वेगळ्या गटांना संधी मिळत गेली. पर्यंत 1962 निवडणुकीत विजयसिंह बळवंतराव यादव यांची नगराध्यक्ष म्हणून निवड झाली तिथून पुढच्या काळामध्ये जास्तीत जास्त निवडणुकीमध्ये त्यांचा प्रभाव दिसून आला.1985 पासून पुढे शिवाजीराव राजाराम सालपे हे युवा नेतृत्व पुढे आले. यांचासुद्धा प्रभाव पेठवडगाव नगरपालिकेच्या राजकारणावर पडत गेला. त्यांनी युवक क्रांती आघाडीच्या माध्यमातून गावातील तरुणांना बरोबर घेऊन यादव आघाडीला सक्षम पर्याय उभा केला. त्या पासून ते आजपर्यंत पालिकेवर यादव आघाडी आणि युवक क्रांती आघाडी गटाची सत्ता आलटून-पालटून येत आहे.पेठ वडगाव नगरपालिकेमध्ये प्रभावी राजकीय गट म्हणूनही या दोन गटांकडे पाहिले जाते. सध्या नगरपालिकेवर युवक क्रांती आघाडीची सत्ता आहे.

**पेठ वडगाव नगरपरिषदेची प्रशासन यंत्रणा-**

नगर परिषदेचे प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्यास मुख्याधिकारी असे म्हटले जाते. मुख्याधिकाऱ्याची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून स्पर्धा परीक्षेद्वारे होते. मुख्याधिकारी हा नगरपरिषदेचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असल्याने नगरपरिषदेच्या संदर्भात त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

महाराष्ट्रात नगर परिषदांचे दर्जाप्रमाणे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार मुख्याधिकाऱ्यांना सुद्धा दर्जा देण्यात आलेला आहे.

| वर्ग | दर्जा |
|---|---|
| अ वर्ग नगरपरिषद | जिल्हाधिकारी |
| ब वर्ग नगरपरिषद | तहसीलदार |
| क वर्ग नगरपरिषद | वर्ग- 2 दर्जाचे अधिकारी |

सुरुवातीस नगरपालिकेच्या स्थापनेवेळी फक्त आठ कर्मचारी होते.

**पेठ वडगाव नगरपरिषदेची उत्पन्नाची साधने-**

पेठ वडगाव नगरपालिका स्थापन झाली त्यावेळी तिच्या उत्पन्नाची साधने कमी स्वरूपात होती. मालमत्ता कर, शिगोटी कर, पान लायसन्स, कोंडवाडा, टोल दस्तुरी याप्रमाणे होते. सध्या नगर परिषदेच्या उत्पन्नाच्या साधनांमध्ये खूप वाढ झाली आहे. त्यामध्ये विविध कररूपाने मिळणारे उत्पन्न- मालमत्ता कर, चित्रपटगृहांवरील कर, जाहिरातींवरील कर, पाणीपट्टी, वाहन कर, अग्निशामन कर, पर्यावरण कर, शिक्षण कर यासर्वबाबींमधून मिळणारे कर. त्याच बरोबर राज्य व केंद्र सरकार मार्फत मिळणारे अनुदान अशी नगरपरिषदेची उत्पन्नाची साधने आहेत.

एकंदरीत सत्ता विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार तळागाळातील लोकांनाही निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने या स्थानिक संस्थांची स्थापना केली आणि त्यातून लोकांचा विकास करणे हा हेतू होता. स्थानिक संस्थांचा इतिहास पाहत असताना पेठ वडगाव नगरपरिषद ही ब्रिटिश कालखंडात म्हणजे 01ऑगस्ट 1887 साली स्थापन झाली आहे. त्या पासून ते आजपर्यंत एकशे बत्तीस वर्षे या नगरपालिका प्रशासनाने व त्या-त्या काळात समोर आलेल्या राजकीय नेतृत्वाने पेठ वडगाव च्या विकासात भर पडली आहे. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची सोय, आरोग्य यंत्रणा व इतर प्राथमिक सुविधांवर भर दिला. परंतु इतक्या वर्षांचा इतिहास नगरपालिकेला

असूनही अत्याधुनिक आरोग्य यंत्रणेवर, शहर नियोजनावर, औद्योगिक विकासावर इथल्या राजकीय नेतृत्वाने व नगरपालिका प्रशासनाने फारसे लक्षकेंद्रित केलेले दिसत नाही. या विविध विकासाच्या मुद्द्यावर लक्ष देणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ -**

1) प्रा. जैन अशोक, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, सेठ प्रकाशन, मुंबई, 1998
2) प्रा. न्हिवेकर सुहास गो., महाराष्ट्र शासन आणि राजकारण, विद्या सुरभी प्रकाशन, कोल्हापूर, 2008.
3) प्रा. डॉ. एखेळीकर रमेश, भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 1999.
4) संपादक देशपांडे अनंत कृष्णराव, गौरव गाथा वडगाव नगर परिषद, पेठ वडगाव, 1987.
5) प्रा. यमलवाड वसंत, स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन, नांदेड.
6) प्रा. डॉ. भणगे रविंद्र पांडुरंग, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था,पुणे, २०१२.